# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# पुणे परिमंडळ पुणे यांचे समोर

ग्राहक तकार क.20/2011 दिनांक : 12/1/2012

श्री.गणपत हरीभाऊ जाधव
मु. जाधववाडी, पो.चिखली
ता. हवेली, जि. पुणे

अर्जदार

## विरुध्द

1—कार्यकारी अभियंता,
मराविविकंमर्या,
सवसु विभाग भोसरी

विरुध्द पक्षकार

2—उप कार्यकारी अभियंता,
मराविविकंमर्या
उपविभाग आकुर्डी

**कोरम :** 1—श्री. शरद मडके,अध्यक्ष
2—श्री.लक्ष्मीकांत सागजकर,सदस्य सचिव
3—श्री. सूर्यकांत पाठक,सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तकार निवारण मंच)
विनियम 2006 मधील 8.2 चे तरतुदीनुसार

**श्री.गणपत हरीभाऊ जाधव, मु. जाधववाडी, पो.चिखली, ता. हवेली, जि. पुणे यांचे शेती वापरासाठी कृषी पंप कनेक्शन क. 171561370019 या ग्राहक कमांकाने गट नं. 659 येथे चालू आहे. सदर जोडणी दि. 13/04/2011 रोजी खांबावर असणा—या ढिल्या तारेवर कावळा बसल्याने शॉर्ट सर्किट होउन उस जळून**



शरद मडके

खाक झाला व वीज पुरवठा लेखी व तोंडी सांगूनही दि. 02/06/2011 पर्यंत सूरु केला नाही व तो दि. 03/06/2011 रोजी सुरु केला व पुन्हा दि.23/08/2011 रोजी पेठकर साहेबांना सांगितल्यावर 24/08/2011 रोजी चालू करण्यात आला. त्यामुळे 13/04/2011 ते 24/08/2011 पर्यत 133 दिवस वीज पुरवठा बंद होता हे सिध्द होते. तरी रु 1200/–प्रति दिनी या प्रमाणे 133 दिवसाचे रु 1,59,600/– व पीकाची भरपाई रु 1,30,000/– असे रु 2,89,600/– भरपाई मिळावी असा अर्ज "अ" फॉर्म मध्ये ग्राहक मंचाकडे दि. 08/12/2011 रोजी सादर करण्यात आला. अंतर्गत ग्राहक तकार निवारण कक्षाने वेळेत वीज पुरवठा करणे गरजेचे होते व सदर कामात अडथळे येत असतील तर पोलीसांची मदत घेउन वीज पुरवठा चालू करावयास पाहिजे होता त्यामुळे संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे वर कंपनीचे नियमानुसार कार्यवाही करावी व शॉर्ट सर्किटमुळे उस जळाल्या बाबत कोणतेही कागदपत्रे नसल्यामुळे नुकसान भरपाई देता येत नाही असा आदेश देण्यात आला.

## ग्राहकाच्या तकारीचे स्वरुप

जाधव वाडी ता. हवेली येथील गट क.659 मध्ये दि.13/04/2011 रोजी खांबावरील ढिल्या तारेवर कावळा बसल्याने दोन तारा एकमेकांना चिकटून एक तार तुटली व शॉर्ट सर्किट मुळे उस पूर्णपणे जळाला हे श्री. गणपत जाधव यांनी विज वितरण कंपनीस कळविले व वीज पुरवठा बंद केला.नंतर श्री. रामलाल वायरमन यांना जोडण्यासाठी वारंवार कळविले पण त्यांनी झाडे तोडल्याशिवाय वीज पुरवठा चालू करता येत नाही असे सांगीतले व दिनांक 09/05/2011 रोजी तसा अर्ज विज वितरण कंपनीत सादर केला. वीज पुरवठा दि.03/06/2011 रोजी चालू झाल्यावर पुन्हा दि.12/08/2011 रोजी शेती पंपाचा वीज पुरवठा 4/5 दिवसापासून बंद आहे व तो त्वरीत चालू करावा असा अर्ज 23/08/2011 रोजी श्री. पेठकर साहेब कार्यकारी अभियंता भोसरी यांना दिल्यावर दि. 24/08/2011 रोजी काम करुन वीज पुरवठा सुरु करण्यात आला. या वरुन 13/04/2011 ते 24/08/2011 पर्यंत 133 दिवस वीज पुरवठा बंद होता. एस.ओ.पी प्रमाणे रु 1200/– प्रति दिनी प्रमाणे 133 दिवसाचे रु 1,59,600 व पिकाची भरपाई रु



शारद मडके

1,30,000/— एकूण रु 2,89,600/— भरपाई मिळावी हा अर्ज दि. 08/12/2011 रोजी ग्राहक गा—हाणे निवारण मंच येथे दाखल करण्यात आला.

## विरुध्द पक्षकार यांचे तर्फे करण्यात आलेली कार्यवाही

दि.13/04/2011 रोजी सांयकाळी वादळी वा—यामुळे ग्राहकाच्या शेतातील लघुदाब वाहिनीची तार तुटली व ती सु बाभळीच्या फांद्यामध्ये अडकली तसेच त्या ठिकाणी शॉर्ट सर्किट मुळे कसल्याही प्रकारची आग लागलेली नव्हती. व ग्राहकाने आग लागून पीक जळाल्याची तकार कोणत्याही सरकारी यंत्रणेकडे नोंदविलेली नाही त्यामुळे पिकाचे नुकसान झाले हे चूकीचे आहे. ग्राहकाला शेती पंपासाठी वीज पुरवठा मिळत नसल्याचा अर्ज दि.09/05/2011 रोजी शाखा कार्यालयात प्राप्त झाला व तो सूरळीत करण्यासाठी शेजारील शेतक—याच्या झाडाच्या फांद्या तोडणे गरजेचे होते परंतु शेजारील शेतक—याने फांद्या तोडण्यास धमकी दिल्यामुळे वीज पुरवठा पूर्ववत करण्यास विलंब झाला व शेजारील शेतक—याची समजूत काढून व झाडाच्या फांद्या तोडून दि. 03/06/2011 रोजी वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. तो पुढील काळात ज्या ज्या वेळी तकार करण्यात आली त्या त्या वेळी तातडीने तकारीचे निरसन करण्यात आलेले आहे.तरी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, एस.ओ.पी. रेग्यूलेशन 2005 कलम 12 प्रमाणे साठ दिवसाचे आत तकार दाराने अर्ज करणे गरजेचे होते परंतू तसे न झाल्यामुळे त्याचा अर्ज खारीज करण्यात यावा व कंपनीस कोणत्याही प्रकारे दंड करण्यात येउ नये अशी विनंती केली आहे.

सुनावणीचे वेळेस श्री. हरीभाउ गणपत जाधव हे उपस्थित होते त्यानी त्यांच्या अर्जात विवरण केल्याप्रमाणे वीज पुरवठा पूर्ववत करण्यास झालेल्या विलंबाचे व एक एकर उस जळाल्याचे सविस्तर कथन केले. उस जळाल्या बद्दल कोणत्याही यंत्रणेकडे तकार न केल्याचे व वर्तमान पत्रात बातमी आल्याचा कोणताही पुरावा नाही हे स्पष्ट सांगितले. कंपनीच्या वतीने श्री. बिक्कड, उप कार्यकारी अभियंता



शरद मडके

आकुर्डी यांनी दि. 03/06/2011 रोजी वीज पुरवठा चालू केल्याचे सांगीतले व दिनांक 09/05/2011 ते 03/06/2011 पर्यंत शेजारील शेतक–याने हरकत घेतल्यामुळे विलंब झाला हे मान्य केले. तसेच त्यांचे आपसात भांडण असल्यामुळे व पिंपरी येथील दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबीत असल्याचे कागदपत्रे सादर केली.

सर्व कागद पत्राची छाननी व अभ्यास करता खालील मुद्दे या तकार प्रकरणी निष्कर्षा प्रत उद्‌भवतात.

श्री.गणपत हरीभाऊ जाधव,मु.जाधववाडी, पो.चिखली,ता. हवेली, जि. पुणे यांनी दि.13/04/2011 रोजी शेती पंपाच्या विज पुरवठयाची तार तुटल्यामुळे वायरमन कडून विज पुरवठा बंद करुन घेतला. तार तुटुन आग लागली असती तर वायरमनला ते दिसले असते व त्यांनी संबंधीत अभियंत्याला तसे कळविले असते परंतु असे काहीही झालेले नाही दि.29/09/2011 रोजी कार्यकारी अभियंता प्रशासन गणेशखिंड मंडल कार्यालय व कार्यकारी अभियंता भोसरी यांनी पाहणी करुन चौकशी केली असता त्यांना असे आढळले की दि. 13/04/2011 रोजी सायंकाळी वादळी वा–यामुळे लघुदाब विज वाहिनीची तार तुटली व सुबाभळीच्या फांद्यामध्ये अडकली त्या मुळे आग लागली नव्हती. शेजारील शेतक–याने आग लागल्याची कसलीही तकार केली नाही व श्री. गणपत हरीभाउ जाधव यांची ही रजिस्टर तकार मध्ये नोंद नव्हती. शॉर्टसर्किट व उस जळाल्याचा कोणताही पुरावा सादर केला नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, ग्राहक निवारण मंच व लोकपाल विनियमन 2005 कलम 6.8 (3) नुसार अधिनियमाच्या कलम 161 खाली तरतूद करण्यात आलेले वीजेचे वितरण पुरवठा व वापरासंबधी अपघात ग्राहक गा–हाणे निवारण मंचाच्या अधिकार क्षेत्रातून वगळण्यात आलेले आहे.

**दि. 09/05/2011 ते 03/06/2011 पर्यंत वीज पुरवठा सुरळीत करण्यास आलेल्या अडचणीमुळे विलंब झाल्याचे वि. प. ने मान्य केले आहे. सदर वाहिनी दोन शेतक–यांच्या बांध्यावरुन गेलेली आहे व दिनांक 09/05/2011 रोजी विज बंद असल्याचा अर्ज मिळाल्यावर विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी विज वाहिनीला अडथळा करणा–या झाडाच्या फांद्या तोडण्यास शेजारील शेतक–याने हरकत घेतली**



शारद मडकुं

व कर्मचा–यांना धमकी दिली व त्याची आपसातील भांडणे न्याय प्रविष्ठ असल्याचे सांगितले शेजारील शेतक–याची समजूत घालून झाडाच्या फांद्या तोडल्यावर दि. 03/06/2011 रोजी विज पुरवठा करण्यात आला. त्यामुळे आपसातील तंटयामुळे विलंब झाल्याचे सिध्द होते . व सदरची तकार विनियमातील तरतुदीनुसार नुकसान भरपाईसाठी ग्राहक गा–हाणे निवारण मंच यांचे कडे तकार दूर झाल्यावर साठ दिवसाचे आत नोंदविणे गरजेचे होते (कृती मानके 2005 ,12.2 कलम) कृती मानकातील कमतरता दि. 03/06/2011 व 24/08/2011 रोजी दूर झाली व नुकसान भरपाईची मागणी दि. 08/12/2011 रोजी ग्राहक मंचाकडे करण्यात आली.

## आदेश

1– ग्राहकाचा नुकसान भरपाई मागणी अर्ज रद्द करण्यात येत आहे.

2– या निर्णया विरुध्द तकार दारास अपील करण्यासाठी त्यांना आदेशाच्या तारखेपासून 60 दिवसाचे आंत मा. विद्युत लोकपाल,केशवा बिल्डींग,बांद्रा कुर्ला वसाहत, बांद्रा पूर्व मुंबई–51 यांचे कडे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| १२/९/२०१२ | | शरद मडके १२.९.१२ |
| श्री.लक्ष्मीकांत सागजकर | श्री.सूर्यकांत पाठक | श्री.शरद मडके, |
| सदस्य/सचिव | सदस्य | अध्यक्ष |

दिनांक: १२/९/२०१२